ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

**कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी** ता. गेवराई जि. बीड

मराठी विभाग

- बी.ए. प्रथम वर्ष
- मराठी ऐच्छिक अभ्यासपत्रिका पहिली
- सत्र पहिले- निवडक अभंग

# संताचे अभंग




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)

मराठी विभाग

ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

**कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड**

मराठी विभाग

❖ संत ज्ञानेश्वर –

निर्जिवां दगडांची काय करिसिल सेवा
तो तुज निर्देवा देईल काय ॥१॥
कवणे गुणें भुली पडली गव्हारा ।
तीर्थाच्या माहेरा नोळखिसी ॥२॥
अष्टोत्तरशें तीर्थे जयाच्या चरणीं ।
तो तुझ्या हृदयीं आत्मरामु ॥३॥
देह देवळीं असतां जासी आना तीर्था ।
मुकलासि आतां म्हणे ज्ञानदेवो ॥४॥



❖ संत ज्ञानेश्वर –

वेड्या हृदयरुपी मंदिरात परमात्मा वास करीत असताना त्याला विसरुन हा दगडच देव आहे. अशा निश्चयाने त्याची सेवा काय करीत बसला आहेस.परमात्म ज्ञानाचा विचार न करता तू जर देहच मी आहे असे मानू लागला तर निर्दैवी असलेल्या तुला दगड काय देणार. तुला काय भूल पडली हे काही कळत नाही. मुख तीर्थाचि माहेर असलेला जो परमात्मा त्याला तुं का ओळखत नाहीस. एकशे आठ तीर्थ ज्याच्या चरणा जवळ आहेत असा परमात्मा तुझ्या हृदयातच आहे. असा जवळच परमात्मा असताना तु उगाच तीर्थभ्रमण करत राहिलास तर तु त्याला मुकशील असे माऊली ज्ञानदेव सांगतात.



ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

**कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड**

मराठी विभाग

❖ संत नामदेव –





प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)

मराठी विभाग

## ❖ संत गोरा कुंभार –

मुकिया साखर चाखाया दिधली । बोलतं हे बोली बोलवेना ॥ १ ॥
तो काय शब्द खुंटला अनुवाद । आपुला आनंद आधाराया ॥ २ ॥
आनंदी आनंद गिळूनि राहणें । अखंडित होणें न होतिया ॥ ३ ॥
म्हणे गोरा कुंभार जीवन्मुक्त होणें । जग हें करणें शहाणें बापा ॥ ४ ॥



ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

**कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड**

मराठी विभाग

❖ संत सेना न्हावी –

चित्त नाहीं हातीं। करूं जाता हरिभक्ति ॥ १॥
मज इतुली वासना।
भेटी द्यावी नारायणा ॥२॥
कोण जाणे दानधर्म ।
नव्हे स्वतंत्र कैचें कर्म ॥३॥
सेना म्हणे सांगें मात।
जेणें माझें होय हित ॥४॥



ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

# कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड

मराठी विभाग


- संत चोखा मेळा –

ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥१॥

कमान डोंगी परी तीर नोहे डोंगा । काय भुललासी वरलीया रंगा ॥२॥

नदी डोंगी परी जळ नव्हे डोंगें । काय भुललासी वरलिया रंगें ॥३॥

चोखा डोंगा परी भाव नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिया रंगा ॥४॥




ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा.डोंगा म्हणजे वाकडा तिकडा ऊस दिसतांना जरी वाकडा तिकडा दिसत असला तरी त्याचा रस मात्र गोडच असतो. रसाची गोडी वाकडी-तिकडी नसते. म्हणून आपण वरवरच्या रंगाला भुलू नये. फसू नये. रंग आणि आकार ह्या दोन्ही गोष्टी म्हणजे बाहेरचे आवरण.ते अगदी वरवरचे स्तर आहेत. त्यालाच आपण फशी पडलो तर गाभ्यातल्या मूळ तत्त्वाशी आपली भेट होणार नाही.आपले मीलन होणार नाही.म्हणून संत चोखा मेळा म्हणतात मी जरी वाकडा वाटले तरी माझा भाव भोळा, आहे सरळ आहे

❖ संत जनाबाई –


संतभार पंढरींत । कीर्तनाचा गजर होत ॥१॥

तेथें असे देव उभा । जैशी समचरणांची शोभा ॥२॥

रंग भरे कीर्तनांत । प्रेमें हरिदास नाचत ॥३॥

सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचें जो जिव्हार ॥४॥

ऐशा संतां शरण जावें । जनी म्हणे त्याला ध्यावें ॥५॥



## ❖ संत एकनाथ –


स्वहिता कारणें संगती साधूची । भावे भक्ति हरीची भेटी तेणे ॥१॥

हरी तेथे संत संत तेथे हरी । ऐसे वेदचारी बोलताती ॥२॥

ब्रह्म डोळसातें वेदार्थ नाकळे । तेथे हे आंधळे व्यर्थ होती ॥३॥

वेदार्थाचा गोवा कन्या अभिलाष । वेदें नाही ऐसे सांगितले ॥४॥

वेदाचींही बीजाक्षरे हरि अक्षरे दोन्ही । एका जनार्दनी हरि बोला ॥५॥



ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

# कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड

मराठी विभाग

- संत तुकाराम –

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ! उदास विचार तेच करी !!१!!


उत्तमचि गती तो एक पावेल ! उत्तम भोगील जीव खाणी !!२!!

परउपकारी नेणे परनिंदा !परस्त्रिया सदा बहिणी माया !! ३!!

भूतदया गाई पशुंचे पालन !तान्हेल्या जीवन वनमाजी !!४!!

शांतीरुपे नव्हे कोणाचा वाईट !वाढावी महत्व वडिलांचे !!५!!

तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ ! परम पद वैराग्याचे !!६!!



ज.भ.शि.प्र.मंडळाचे,

**कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड**

मराठी विभाग

# ❖धन्यवाद .........||




प्रा. रमेश बाबासाहेब रिंगणे (सहाय्यक प्राध्यापक)

मराठी विभाग